नि.फौ.ख.क्र.५७/२०१९



सरकार वि. लक्ष्मण

नि.क्र. १७

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ४ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि

नाव – झेलु ईश्वर शिंदे मेश्राम,

वय – ४५ वर्ष, व्यवसाय – मजुरी,

राहणार – गोवरी, ता. मौदा,जिल्हा – नागपूर

सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा

मी आरोपी लक्ष्मण याला ओळखते. फिर्यादी ईश्वर माझे पती आहे. घटना ही अंदाजे तिन वर्षापुर्वी संध्याकाळी सहा वाजताचे सुमारास गोवरी गावातील बाजारात घडली होती. त्यावेळी मी त्या बाजारात गेली होती. बाजारात भाजीपाला घेत असतांना माझे पती व आरोपी यांच्यात भांडण झाल्याचा आवाज आला. भांडणाचा आवाज आला त्यामुळे मी तेथे धावली असता माझे पतीच्या डोक्यावर गोटा मारल्याने रक्त निघत असल्याचे दिसल्याने मी माझेकडील कपडयाचे पट्टी त्याचे डोक्यावर बांधली. माझे पतीच्या डोक्यावर तो गोटा आरोपी लक्ष्मण याने मारला होता. त्यामुळे माझे पतीला दवाखान्यात भरती केले. पोलीसांनी माझे बयान घेतले होते. आज रोजी आरोपी लक्ष्मण न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीचे ॲड.श्री. ए.एस.रेवतकर यांचे द्वारे –**

मी भाजी घेत असतांना माझे पतीसोबत आरोपी लक्ष्मण याचे भांडणाचा आवाज आल्याने मी तिकडे धावल्याचे व माझे पतीच्या डोक्याला कापडाचे पट्टी बांधल्याचे पोलीसांना बयान देतेवेळी सांगितले होते. सदर बाब माझ्या बयानात का नमुद नाही याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की माझे पती दारु पितात. हे म्हणणे खरे नाही की माझे पती दारु पिवुन असल्याने पडल्याने त्यांना मार लागला होता. हे म्हणणे खरे नाही की आरोपी लक्ष्मण याने माझे पतीला डोक्यावर गोटा मारल्याचे मी खोटे सांगत आहे.

उलटतपास संपला.

फेरतपास काही नाही.

समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत.

मौदा.

दिनांक ०५.०५.२०२२

(एस.पी वानखडे)

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा